दैनिक दिव्य मराठी

# रिपोर्ट:मुंबईतील BJP अन् शिंदे गटाच्या आमदारांची कामगिरी घसरली, ठाकरे गटाची उंचावली; आमदारांच्या कामगिरीचे प्रगती पुस्तक

मुंबई एका दिवसापूर्वी



प्रजा फाउंडेशनने मुंबईतील विद्यमान आमादारांच्या 2 वर्षांतील घटनात्मक आणि वैधानिक कर्तव्यांशी संबंधित एक मूल्यमापन अहवाल जारी केला आहे. अधिवेशन कालावधीतील आमदारांच्या कामगिरीशी संबंधित या अहवालात भाजपच्या आमदारांची कामगिरी घसरल्याची धक्कादायक बाब स्पष्ट झाली आहे.

प्रजा फाऊंडेशनने नुकतेच 'मुंबईतील आमदारांचे प्रगती पुस्तक 2023' प्रकाशित केले. त्यात भाजपच्या आमदारांची कामगिरी घसरल्याचे निष्पन्न झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वतील शिवसेनेच्या गटाचे काही आमदारही यात पिछाडीवर पडलेत. तर ठाकरे गटाच्या आमदारांनी आपली कामगिरी उंचावण्याचा प्रयत्न केला आहे.

## आशिष शेलार पिछाडीवर

या अहवालानुसार, मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार गतवर्षीच्या तुलनेत यंदा पिछाडीवर पडलेत. शेलार गतवर्षी 7 व्या क्रमांकावर होते. मात्र यंदा ते 9 व्या क्रमांकावर घसरलेत. आमदार अमित साटम यांनी आपला 4 था क्रमांक अबाधित ठेवला आहे. आमदार भारती लव्हेकर यांनी काहिशी चांगली कामगिरी करत 13 व्या क्रमांकावरून 6 व्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

पराग शाह यांनीही 14 व्या क्रमांकावरून थेट 5 व्या क्रमांकावर उडी घेतली आहे. आमदार मिहीर कोटेचा यांनीही 15 व्या क्रमांकावरून 11 व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. याऊलट योगेश सागर 10 व्या क्रमांकावरून 14 व्या क्रमांकावर घसरलेत.

## कालिदास कोळंबकरांची घसरण

कालिदास कोळंबकर 12 व्या क्रमांकावरून 20 व्या क्रमांकावर पोहोचलेत. पराग आळवणी दुसऱ्या क्रमांकावरून थेट सातव्या क्रमांकावर घसरले आहेत. तर भाजपचे आमदार तमिळ सेलवन गतवर्षी ११ व्या क्रमांकावर होते. ते एका पायरीने घसरून 12 क्रमांकावर घसरले आहेत. अतुल भातखळकर यांची 5 व्या क्रमांकावरून थेट 17 व्या क्रमांकावर फेकले गेले आहेत.

**शिंदे गटातील आमदारांची कामगिरी**

- आमदार सदा सरवणकर 21 व्या क्रमांकावरून 28 व्या क्रमांकावर फेकले गेलेत.
- आमदार मंगेश कुडाळकर 9 व्या क्रमांकावरून 13 व्या क्रमांकावर घसरलेत.
- दिलीप लांडे यांची कामगिरी 23 व्या क्रमांकावरून 27 व्या क्रमांकवर घसरली आहे.
- आमदार प्रकाश सुर्वे यांनी 30 व्या क्रमांकावरून 25 व्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

**ठाकरे गटाची आमदारांची कामगिरी**

- रवींद्र वायकर यांनी 31 व्या क्रमांकावरून थेट 22 व्या क्रमांकावर पोहोचलेत.
- सुनील राऊत यांची 20 व्या क्रमांकावरून 29 व्या क्रमांकावर घसरण झाली आहे.
- आमदार सुनील प्रभू यांनी तिसऱ्या क्रमांकावरून दुसऱ्या क्रमांकावर भरारी घेतली आहे.
- रमेश कोरगावकर यांनी 26 व्या क्रमांकावरून 24 व्या क्रमांकावर भरारी घेतली आहे.
- संजय पोतनीस यांनी 22 व्या क्रमांकावरून 21 व्या क्रमांकावर झेप घेतली आहे.
- अजय चौधरी यांनी 24 व्या क्रमांकावरून 19 व्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

Link: मुंबईतील BJP अन् शिंदे गटाच्या आमदारांची कामगिरी घसरली, ठाकरे गटाची उंचावली; आमदारांच्या कामगिरीचे प्रगती पुस्तक | Bjp Mla Vs Uddhav Thackeray Group | Performance Report Update | Praja Foundation - Divya Marathi (bhaskar.com)